# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागातील कर्मचाऱ्यांना थकीत वेतन तात्काळ अदा करण्याबाबत

**(१) ३५२७८ (०७-०१-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागातील ३५० ते ४०० कार्यरत कर्मचाऱ्यांचे मागील ३ महिन्यांपासून वेतन प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित वेतन अदा करण्याची मागणी उक्त कर्मचाऱ्यांनी संबंधित विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्मचाऱ्यांना प्रलंबित वेतन तात्काळ अदा करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
कर्मचाऱ्यांचे वेतन थकीत नाही.
(२), (३) व (४) लागू नाही.

---

### मौजा पळसगांव राका (ता.सडक अर्जुनी, जि.गोंदिया) येथील माजी मालगुजारी तलावासाठी भूसंपादन केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला न मिळाल्याबाबत

**(२) ४१३५५ (०७-०४-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा पळसगांव राका (ता.सडक अर्जुनी, जि.गोंदिया) येथील माजी मालगुजारी तलावासाठी सन १९८९-९० या कालावधीत शेतकऱ्यांची खाजगी जमीन संपादित करण्यात आली असून त्यांना अद्यापपर्यंत रोजगार हमी विभागाकडून मोबदला देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी गोंदिया पाटबंधारे विभाग, गोंदिया यांनी भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केला असता शासनाने ३१ लक्ष ३० हजार रुपयांचा निधी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ यांच्याकडे जमा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी भूसंपादनाची प्रत्यक्ष रक्कम २ कोटी ८३ लक्ष ऐवढी असून संपादित जमीन रोजगार हमी योजनेंतर्गत कामासाठी असल्याने उर्वरीत निधी या योजनेतून द्यावा असा प्रस्ताव मागील १० वर्षापासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गोंदिया पाटबंधारे विभाग यांच्याकडे दिनांक २७ मार्च, २००० रोजी वा त्यासुमारास निधी जमा करण्यात आला असता विभागीय आयुक्त, नागपूर यांनी शेतकऱ्यांना निधी वाटपापूर्वी निधी परत करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात स्थानिक शेतकरी व लोकप्रतिनिधी यांनी लोकशाही दिनानिमित्त तक्रार केल्याचे तसेच उक्त प्रकरणी अनियमित कारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०६-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नाही, हे खरे नाही.
(४) होय.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने घेण्यासाठी रोहयोच्या प्रकरणांबाबत केवळ वार्षिक बाजारमूलय दर ( रेडी रेकनर दर ) विचारात घेऊन मोबदल्याची परिगणना करण्याबाबत दिनांक ३०.११.२०१८ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले असून सुधारित परिगणना व त्यानुषंगाने निधी मागणीच्या अभिप्रायासह प्रस्ताव शासनास सादर करावा असे विभागीय आयुक्त, नागपूर यांना कळविण्यात आले आहे. अहवाल प्राप्त झाल्यावर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

---

## निरा देवघर (ता. भोर, जि. पुणे) येथील प्रकल्पबाधितांच्या मागण्याबाबत

**(३) ४७०६५ (१४-१०-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निरा देवघर प्रकल्प, (ता.भोर, जि. पुणे) येथील पुनर्वसित गावांतील प्रकल्पबाधित व लोकप्रतिनिधी आणि संबंधित अधिकारी यांच्या समवेत पुनर्वसन दिन दिनांक २० एप्रिल, २०२२ रोजी मौजे हिर्डोशी (ता.भोर, जि.पुणे) येथे बैठक झाली आहे, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, या बैठकीत पुनर्वसित गांवठाणातील रस्ते, वीज, पाणी, स्वच्छता यांच्या समस्या तसेच पर्यायी घरे, जमीन न मिळणे, संपादीत घरे, जमीनीचा मोबदला न मिळणे, याबाबत बाधितांनी प्रशासनासमोर मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने पुनर्वसन बाधितांच्या मागण्या पूर्ण करण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०३-११-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

निरा देवघर प्रकल्पातंर्गत पुनर्वसीत गावठाणातील प्रकल्पबाधीतांनी परहर खुर्द आणि परहर बुद्रुक, देवघर, साळव, वारवंड, कुडली खुर्द या गावठाणामधील नागरी सुविधांबाबत कामे करणेबाबत विनंती केलेली असुन पुनर्वसीत गावठाणाकरीता १८ नागरी सुविधांची कामे जलसंपदा विभागामार्फत करण्यात येत असुन काही नागरी सुविधा पुर्ण झालेल्या असुन उर्वरीत नागरी सुविधांची कामे प्रगतीपथावर आहे.

प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन, भुखंड, जमिनीचा मोबदला, संपादीत घरे याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालय पुणे व सातारा यांच्या कार्यालयाकडुन सुरु आहे. त्यानुषंगाने सदर बाबींसंदर्भात तात्काळ कार्यवाही करणेबाबत संबधितांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.
प्रश्न उद्भवत नाही.

---

**वीर (ता.पुरंदर,जि.पुणे) येथील वीर नाला संगम जलाशय प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना जमिनीचा हक्क देण्याबाबत**

**(४) ५१७४२ (२७-०१-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीर (ता.पुरंदर, जि.पुणे) येथील वीर नाला संगम जलाशय प्रकल्पग्रस्त शेतकरी पुनर्वसन केलेल्या जमिनीवर हक्क मिळवून देण्यासाठी गत ३० वर्षापासून संघर्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाविरुद्ध तसेच तहसिलदार कार्यालय व भूमी अभिलेख कार्यालयाकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांनी त्यांच्या बायका मुलांसहीत जलाशयाच्या काठावर उपोषण केले असून, सदर प्रकरणी न्याय न मिळाल्यास वीर नाला फोडण्याचा इशारा माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना पुनर्वसन केलेल्या जमिनीवरील हक्क मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०३-११-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) सदर प्रकरणी काही शेतकऱ्यांनी दिनांक १४.१०.२०२२ ते १६.१०.२०२२ (३ दिवस) वीर नाला प्रकल्प, वीर येथे लाक्षणीक उपोषण केलेले आहे.

(३) वीर नाला प्रकल्पातील प्रकल्पग्रसतांना सन १९९६ मध्ये वाटप करण्यात आलेल्या जमिनी या वीर प्रकल्पासाठी संपादीत झालेल्या जमिनीपैकी असून गटवारीमध्ये त्यांचे अधिकार अभिलेख ७/१२ तयार करण्यात आलेला नसल्याने त्यांची वाटप करण्यात आलेल्या जमिनीस नोंदी झालेल्या नाहीत.

भुमी अभिलेख कार्यालयामार्फत जमिन एकत्रिकरण योजना दुरुस्तीकामी प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यानुषंगाने संबधित सर्व्हे नंबरची मोजणी झालेली असुन दुरुस्तीबाबतचा प्रस्ताव जिल्हा भुमी अभिलेख कार्यालयाकडे कार्यवाहीत आहे. सदर कार्यवाही पुर्ण झालेनंतर ७/१२ सदरी नोंद घेण्याची कार्यवाही करता येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**हिडोंशी (ता.भोर, जि.पुणे) येथील देवघर प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन मिळण्याबाबत**

**(५) ५३६४९ (२७-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिडोंशी (ता.भोर, जि.पुणे) येथील देवघर प्रकल्पग्रस्तांनी ६५ टक्के दुरुस्त रक्कम भरलेल्या ३५ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन यांना दिनांक ८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०३-११-२०२३) :** (१, व (२) तत्कालीन मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २५.०३.२००८ रोजीच्या बैठकीतील निर्देशांनुसार पुणे जिल्ह्यातील निरा देवघर प्रकल्पाचे बुडीत गाव मौजे हिर्डोशी ता.

भोर जि. पुणे येथील सुधारीत ६५ टक्के रक्कम भरुन घेतलेल्या ३५ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिन वाटप करणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त पुणे यांचेमार्फत शासनास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास दिनांक १३.०६.२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नालासोपारा ( ता.वसई, जि. पालघर) येथील ऐतिहासिक बुद्ध स्तूपाचे जतन आणि संवर्धन तसेच पर्यटकांसाठी सोई-सुविधा पुरविण्याबाबत.**

**(६) ५६८११ (१३-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नालासोपारा ( ता.वसई, जि. पालघर) येथील ऐतिहासिक बुद्ध स्तूपाचे जतन आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीने तेथील भगवान गौतम बुद्ध यांच्या पुतळयाची देखभाल, दुरुस्ती, डागडुजी आणि या वास्तूचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता सुरक्षा रक्षक नेमून तेथे येणाऱ्या पर्यटकांसाठी सोई-सुविधा पुरविण्याची मागणी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, पर्यटन मंत्री, महाराष्ट्र राज्य व अधीक्षक भारतीय पुरातन सर्वेक्षण विभाग, सायन, मुंबई यांच्याकडे दिनांक १६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी संचालक, पुरातन व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई यांनी दिनांक २१ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास अधिक्षक पुरातत्व विभाग अधिकारी यांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-११-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
नालासोपारा (ता. वसई, जि. पालघर) येथील ऐतिहासिक बौद्ध स्तूप हे केंद्र संरक्षित स्मारक असून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग, मुंबई मंडळाच्या अखत्यारीत आहे. नालासोपारा येथील बौद्ध स्तूपाचे जतन व संवर्धन करण्याची विनंती प्राप्त झाली आहे. बौद्ध स्तूपाच्या संरक्षित जागेपासून २५० मीटर अंतरावर असलेल्या भगवान गौतम बुद्धाची मूर्ती भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग, मुंबई मंडळाच्या अखत्यारीत येत नाही. भागवान गौतम बुद्धाच्या मूर्तीची देखभाल वसई विरार महानगरपालिकेकडून केली जाते.
(२) होय, हे खरे आहे.
(३) नालासोपारा येथील बौद्ध स्तूपाचे जतन आणि संवर्धन भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाद्वारे करण्यात येते. स्मारकास भेट देणाऱ्या पर्यटकांच्या सोयीसाठी प्रवेश मार्ग आणि माहिती फलकाची व्यवस्था करण्यात आली आहे. स्तूपांचे संवर्धन सुरु असून पहारेकरी कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. परिसराचे नैसर्गिक सौंदर्य आणि सुशोभिकरण करण्याचे काम सुरु आहे. यापुढील काळात पिण्याच्या पाण्याची व शौचालयाची सोय आवश्यकतेनुसार आणि वार्षिक जतन-संवर्धन कार्यक्रमानुसार मंजूर करण्याचे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ यांचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यात पोकरा अंतर्गत गावांमध्ये २४ तास कृषी वीजपुरवठा करण्याबाबत**

**(७) ५७२३४ (३०-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भातकुली दर्यापूर आणि अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) हे तालुके खारपान पट्याचे असून या तालुक्यातील बहुतांश गावे नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत समाविष्ट असून जिल्ह्यातील एकूण ७३२ गावांचा या योजनेत समावेश असल्याचे माहे जानेवारी २०२३ , मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत समाविष्ट गावांमध्ये शेतकऱ्यांना सिंचनाच्या सोयी उपलब्ध नसल्याने प्रकल्पातील समाविष्ट घटकांमध्ये प्रामुख्याने फळबाग लागवड , पोलीहाऊस , ग्रीनहाऊस , व अन्य सुविधा पुरवणाऱ्या योजना राबवल्या जात असताना पट्ट्यातील गावांमध्ये शेतकऱ्यांना वीज उपलब्ध नसल्याने त्यांना उक्त पोकरा अंतर्गत योजनेचा लाभ घेता येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यात पोकरा अंतर्गत गावांमध्ये २४ तास कृषी वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०२-११-२०२३) :** (१) होय, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पामध्ये अमरावती जिल्ह्यातील विदर्भातील पूर्णा नदीच्या खोऱ्यातील खारपाण पट्ट्यातील गावांसह ५३२ गावांचा समावेश आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

प्रकल्पामध्ये समाविष्ट असलेल्या अमरावती जिल्ह्यातील ५३२ गावांमधील कृषिपंपापैकी २७८ गावांमध्ये मिश्र/गावठाण विद्युत वाहिन्यांद्वारे २४ तास वीज पुरवठा केला जात असून उर्वरित २५४ गावांमधील कृषिपंपाना एकूण ७० कृषि वाहिन्यांद्वारे दिवसा किंवा रात्री ८ तास थ्री फेज वीज पुरवठा चक्राकार पध्दतीने केला जात आहे. त्यापैकी १७ कृषि वाहिन्यांवर २४ तास थ्री फेज वीज पुरवठा करण्याच्या अनुषंगाने निधी उपलब्धतेबाबत उर्जा विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यात पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदाबाबत**

**(८) ५७३०० (०९-०५-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: अमरावती, पुणे, यवतमाळ, बुलढाणा, सिंधुदूर्ग, रत्नागिरी व सांगली या जिल्ह्यांमध्ये पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची ५० टक्के पेक्षा अधिक पदे रिक्त असल्याने पशुधनावर उपचार करण्यास पशुपालकांना अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरुर (जि.पुणे) पंचायत समिती येथील पशुधन विस्तार अधिकारी व पशुधन पर्यवेक्षकाची पदे रिक्त असून पशुधन विस्तार अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार सोपविल्याने वेळेवर कामे मार्गी लागण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यातील चार ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखाना असून पशुवैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचारी यांची पदे रिक्त असल्याने तोंडखुरी व पायखुरी अशा आजारांच्या साथीदरम्यान जनावरांच्या तपासणीकरिता पशुपालकास अडचणीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील १८ पशुवैद्यकीय दवाखान्यांपैकी सात दवाखान्यात पशूधन पर्यवेक्षकाच्या जागा रिक्त असून राज्यस्तरीय दवाखान्यातही पाच जागा रिक्त असल्यामुळे पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कारभारावर कोणाचेही नियंत्रण राहिले नसल्याने पशुंना वेळेत उपचार मिळत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा परिषद आणि राज्याच्या अखत्यारितील दोन्ही पशुसंवर्धन विभागातील १५६ पदांपैकी ६७ पदे मागील काही दिवसांपासून रिक्त असून रत्नागिरी जिल्ह्यातही पशुधन अधिकाऱ्यांची २४, पर्यवेक्षकाची १२४ तसेच सहाय्य आयुक्त, ६ आणि सहाय्य पशुधन अधिकाऱ्याची २ पदे मागील अनेक दिवसांपासून रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, रत्नागिरी जिल्हयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत, तसेच रिक्त पदे भरण्याऐवजी ८५ कंत्राटी अधिकारी नियुक्त करण्यात आले असल्याने पशुसंवर्धन विभागात खाजगी आणि भरतीप्रक्रीया बंद असल्यामुळे पशुसंवर्धन विभागातील कर्मचाऱ्यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान काम बंद आंदोलन पुकारले होते, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन राज्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-११-२०२३) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) काही प्रमाणात पदे रिक्त आहेत, हे खरे आहे. तथापि पशुपालकांची गैरसोय होऊ नये तसेच पशुपालकांची कामे वेळेवर व्हावी यासाठी पशुधन पर्यवेक्षकांची ११५९ पदे (राज्यस्तर २८६ व जिल्हा परिषदस्तर ८७३) आणि पशुधन विकास अधिकाऱ्यांची २९३ पदे बाह्य स्त्रोतांद्वारे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात आली आहेत. भरतीप्रक्रिया बंद असल्यामुळे कर्मचाऱ्यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान काम बंद आंदोलन पुकारले नाही.
(७) रिक्त पदे कायमस्वरुपी भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत विभागातील गट-अ संवर्गातील ३५४ पदे व स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये करण्यात येणाऱ्या पदभरती मोहीमेअंतर्गत पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या अधिनस्त गट-क संवर्गाची ४४६ पदे भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

---

**नागपूर येथील महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या आयुक्तालयात ५२ टक्के पदे रिक्त असल्याबाबत**

**(९) ५७३२१ (२१-०४-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्रामीण भागात मागेल त्याला कामांची हमी देणाऱ्या महत्त्वपूर्ण महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या नागपूर येथील आयुक्तालयात सहाआयुक्तांसह विविध संवर्गातील ५२ टक्के पदे रिक्त असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त संवर्गातील निम्म्याहून अधिक पदे रिक्त असल्यामुळे येथील कामात अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून येथील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०६-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
मंजूर १८ पदांपैकी ०५ पदे रिक्त आहेत.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दापोली( जि.रत्नागिरी ) तालुक्यातील हर्णे येथे मत्स्य व्यवसायावर आधारित सागरी विदयापीठ करण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत**

**(१०) ५८०१४ (२१-०४-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दापोली (जि.रत्नागिरी) तालुक्यातील हर्णे येथे मत्स्य व्यवसायावर आधारित सागरी विद्यापीठ स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हर्णे येथे मत्स्य व्यवसायावर आधारित सागरी विद्यापीठ व्हावे याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधिंनी शासनाकडे पाठपुरावा केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी सागरी विद्यापीठ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-११-२०२३) :** (१) हे खरे नाही
(२), (३), व (४) कोकण विभागासाठी मत्स्य विज्ञान विद्यापीठ स्थापन करण्याबाबत डॉ. मुणगेकर समितीने अहवाल सादर केला होता. तथापि, केवळ ३ मत्स्य विज्ञान महाविद्यालयासाठी वेगळे सागरी विद्यापीठ स्थापन करण्याची आवश्यकता नाही, असा शासनाने निर्णय घेतला आहे.

---

**चासकमान (ता.शिरुर, जि.पुणे)) प्रकल्पाच्या पुनर्वसनाच्या जमिनींचे निवाडे न करता धरणग्रस्तांना वाटप केल्याबाबत**

**(११) ५८३७७ (०९-०५-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चासकमान (ता.शिरुर, जि.पुणे)) प्रकल्पाच्या पुनर्वसनाच्या जमिनींचे निवाडे न करता धरणग्रस्तांना वाटप करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संपादन झालेल्या क्षेत्रातुन गेलेले कॅनोल, पाझर, तलाव व रोड यांचे क्षेत्र वजा न करता जादा स्लॅब आकारण्यात आला असून, संपादित जमीनीचे संयुक्त मोजणी सबंधित शेतकऱ्यांच्या संमती शिवाय करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, बोगस अपात्र व मयत धरणग्रस्तांना चासकमान लाभ क्षेत्रातील जमिनीचे वाटप झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या सबंधित जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, सबंधित भूमि अभिलेख कार्यालय या विभागाची दप्तर तपासणी करण्याबाबत लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांची मागणी होत आहे आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, अयोग्य भूसंपादन व अनियमितता यांचे पुनर्वीलोकन प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत धरणग्रस्तांना वाटप व ताबे थांबविणेबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, भूसंपादन प्रक्रियेची अनियमितता असतानाही धरणग्रस्तांना जमिन वाटप, ताबा देणे या गोष्टी विविध स्तरावर चालू असताना त्या सबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अनिल पाटील (०३-११-२०२३) :** (१) चासकमान प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मौजे शिक्रापूर व राऊतवाडी ता. शिरुर येथिल जमिनी संपादन करणेकामी प्रस्तावित ९० गटांपैकी ३४ गटांचा निवाडा अंतिम करण्यात येवून खातेदारांना नुकसान भरपाई अदा करण्यात आली.

(२) संपादीत जमिनीच्या संयुक्त मोजणी वेळी नियमानुसार संबंधितांना रितसर नोटीस तामील करुन भुसंपादन प्रतिनिधीचे उपस्थितीत त्यांनी दाखविलेल्या सिमांकनानुसार संयुक्त मोजणी करण्यात आलेली आहे.

(३) मौजे वढु बु ता शिरुर येथील क्षेत्र १ हे ६१ आर दिनांक ११.०१.२०१९ रोजीच्या आदेशान्वये पर्यायी जमिन म्हणुन मयत व्यक्ती मारुती लक्ष्मण भोसले यांचे नावे वाटप झाल्याबाबत दिसुन येत आहे. यासंदर्भात सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

(४), (५) व (६) पुणे जिल्हा पुनर्वसन कार्यालयातील कामकाजाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी चौकशी समिती गठित केली आह. सदर समितीने सविस्तर चौकशी करुन विभागीय आुक्त कार्यालय पुणे यांचेकडे अहवाल सादर करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने तत्कालीन जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे व इतर अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

---

### महालगाव (काळू) (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) येथे रोपवनात पहारेकरीचे वेतन अन्य व्यक्ती घेत असल्याबाबत

**(१२) ६०८७६ (२१-०४-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महालगाव (काळू) (ता.चिमूर, जि.चंद्रपूर) येथील बिटातील कक्ष क्रमांक २० मध्ये वनविकास महामंडळाने वनाचा विकास करण्यासाठी रोपवन तयार केले असून पहारा देण्यासाठी तसेच रोपांची काळजी घेण्यासाठी पहारेकराच्या नेमणुका केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पहारेकराच्या नेमणूका ह्या एकाच्या नावावर असून वेतन अन्य व्यक्ती घेत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिक या रोपवनात पहारा देण्याचे काम करीत असुन वन विभागाच्या अनियंत्रित कारभारामुळे रोपवनात रोपटीच दिसत नसल्याने यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२५-१०-२०२३) : (**१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर रोपवनात देखरेखीसाठी दोन पहारेकरी तैनात करण्यात आले आहेत. सदर पहारेकऱ्यांना मग्रारोहयो खाली जॉबकार्ड जारी करण्यात आलेले आहे. सदर रोपवनाची माहे ऑक्टोंबर, २०२२ अखेर जिवंत रोपांची टक्केवारी ७९.८०% असल्याने कोणतीही अनियमितता झाल्याचे दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भुसावळ (जि.जळगाव) येथे कृषी कार्यालयात २४ कृषी सहाय्यकांची पदे मंजूर असूनही फक्त ११ कृषी सहाय्यक कार्यरत असल्याबाबत

**(१३) ६४६४२ (२४-०८-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगाव) येथे कृषी कार्यालयात २४ कृषी सहाय्यकांची पदे मंजूर असताना फक्त ११ कृषी सहाय्यक कार्यरत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक कृषी सहाय्यकांवर ६ ते ७ गावांचा भार पडला असून ५१ गावांचा भार ८ कृषी सहाय्यकांवर असल्यामुळे पंचनामे उशिराने होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार रिक्त जागा भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०६-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, भुसावळ (जि.जळगाव) येथे कृषि सहाय्यकांची एकूण २५ पदे मंजूर असून त्यापैकी १० पदे भरलेली व १५ पदे रिक्त आहेत.
(२) कृषि सहाय्यकांच्या रिक्त पदांचा अतिरीक्त पदभार नजिकच्या कृषि सहाय्यक यांचेकडे देवून कृषि विभागाच्या योजनांची अंमलबजावणी करण्यात येत असून पंचनामे वेळेवर होतील याची दक्षता घेतली जात आहे.
(३) वित्त विभागाच्या दि.३१.१०.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये ज्या विभागांचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नाही अशा विभागांना (वाहनचालक व गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांच्या ८० टक्के मर्यादेपर्यंत पदे भरण्यास मुभा देण्यात आलेली आहे. त्यानुसार विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक यांच्याकडून नाशिक विभागातील कृषि सहाय्यकांच्या ३३६ पदांकरीता दि.११.०८.२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यानुसार नाशिक विभागातील कृषि सहाय्यकांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक यांचेस्तरावर सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चिरनेर ग्रामपचायत (जि.रायगड, ता.उरण) केलाचा माळ व चांदायली आदिवासी पाडयातील नागरीकांच्या पिण्याच्या पाण्याच्या समस्येबाबत

**(१४) ६४७७९ (३०-०८-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उरण (जि.रायगड) तालुक्यातील चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील केलाचा माळ व चांदायली आदिवासी पाडयातील नागरीकांसाठी असलेली एकमेव पाण्याची विहिर आटल्यामुळे पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण झाल्याचे दिनांक १७ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिरनेर जंगल सत्याग्रहात सन १९३० साली हुतात्मा झालेले नाग्या कातकरी यांचे वंशज राहत असलेल्या व सत्याग्रहाची पार्श्वभूमी असलेल्या या आदिवासी वाडीला वर्षानुवर्षे पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागतो आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आदिवासी पाडयातील नागरीकांना तात्काळ पिण्याचे पाणी मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर चिरनेर ग्रामपंचायत हद्दीतील केळयाचा माळ व चांदायली आदिवासी वाडी या आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्रातील (OTSP) आहे. सदर वाडयांकरीता जलजीवन मिशन अंतर्गत योजना मंजूर असून उपवनसंरक्षक, अलिबाग यांच्या दि. ३१/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अनुसूचित जमाती व अन्य पारंपारीक वननिवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम २००६, नियम २००८ व सुधारणा नियम २०१२ चे कलम ३(२) अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत, चिरनेर मधील अक्कादेवी, चांदायली वाडी व केळयाचामाळ करीता पाण्याची पाईपलाईन व टाकीचे ०.३०६१ हेक्टर वनक्षेत्रात बांधकाम करण्याचे प्रस्तावास मंजुरी देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अनुसूचित जमातीतील पात्र लाभार्थ्यांना घरकुल उपलब्ध करून देण्यासाठी 'शबरी आदिवासी घरकुल योजना' राबविण्याबाबत

**(१५) ६४७८६ (३०-०८-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जमातीतील पात्र लाभार्थ्यांना घरकुल उपलब्ध करून देण्यासाठी 'शबरी आदिवासी घरकुल योजना' राबविण्यात येणार असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील किती लोकांना या योजनेचा लाभ होणार आहे, तसेच सदर योजनेचे स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, कधीपर्यंत ही योजना लागू होणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-११-२०२३) :** (१),(२) व (३) राज्यातील ज्या अनुसूचित जमातीच्या कुटुंबांची घरे ही कुडा- मातीची आहेत किंवा अनुसूचित जमातीची जी कुटुंबे बेघर आहेत अशा अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना पक्की घरे उपलब्ध करुन देण्यासाठी आदिवासी विकास विभागाच्या दि. २८.०३.२०१३ च्या शासन निर्णयान्वये सन २०१३ पासून "शबरी आदिवासी घरकुल योजना" राबविण्यात येत आहे.

शबरी आदिवासी घरकुल योजनेतंर्गत माहे सप्टेंबर, २०२३ अखेरपर्यंत ३,१०,७४१ एवढ्या घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी १,०२,०८० घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. उर्वरित घरकुलांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील माणगाव (इंदे) येथील शेतकऱ्यांची बनावट कागदपत्रांव्दारे फसवणूक केल्याबाबत

**(१६) ६४९३७ (२७-०८-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील धसई पंचक्रोशीतील बंगालपाडा माणगाव, इंदे, दुधनोली, मढ अशा ३५६ शेतकऱ्यांचे नावे बंगालपाडा येथील एका शेतकऱ्याने "समता फार्मसी प्रोड्युसर लि." या नावाने कंपनी स्थापन करुन बनावट कागदपत्रांच्या आधारे कृषी विभागाच्या योजनेचा गैरप्रकार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या अवैध कंपनीचा अध्यक्ष श्री.बुधाजी बाबू बंगाल यांनी शासनाच्या योजनेतून मंजूर झालेल्या निधीमधून पॅकहाऊस स्वत:च्या जागेत बांधून खाजगी कामासाठी वापर केला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी जिल्हा कृषी अधिकारी, मुरबाड तहसीलदार यांच्याकडे तक्रार करुनही शेतकऱ्यांना अद्यापी न्याय मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०६-११-२०२३) :** (१) मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत समता फार्मसी प्रोड्युसर लि. या कंपनीस भात मुल्यसाखळी विकासशाळा उप प्रकल्प मंजूर केला होता. परंतु, कंपनीच्या अंतर्गत तक्रारी आणि वादामुळे या उपप्रकल्पास स्थगिती देण्यात आली असून कंपनीस कृषि विभागाच्या कोणत्याही योजनेचा लाभ दिलेला नाही.

(२) हे खरे नाही, सदर कंपनीस पॅक हाऊसचा लाभ दिलेला नाही.
(३) व (४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून त्यानुसार शेतकरी उत्पादक कंपनीच्या भागधारकांमध्ये अंतर्गत वाद असल्याने मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पातंर्गत मंजूर उप प्रकल्पाला स्थगिती देण्यात आली आहे. अंतर्गत वाद संपुष्टात न आल्यास उप प्रकल्प रद्द करण्यात येईल तसेच भागधारक शेतकऱ्यांमधील वाद निवाडया साठी कंपनी नोंदणी प्राधिकाऱ्याकडे म्हणजेच कंपनी निबंधक यांचेकडे दाद मागण्याचे तक्रारदार शेतकऱ्यांना सुचित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे आडी (ता.जि.रत्नागिरी) येथील जमिनीवरील झाडे विनापरवाना तोडून चोरुन नेल्याबाबत**

**(१७) ६४९५५ (२७-०८-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे आडी (ता.जि.रत्नागिरी) येथील भूमापन क्रमांक व उपविभाग २६/०८/१+७/१० क्षेत्र ०-१९-०० हे.आर या जमिनीवरील सुमारे १०० वर्षांपूर्वीची फणसाची ५ व आंब्याची ६ झाडे यांच्या मालकीची असल्याने त्यांची व शासनाची परवानगी न घेता तोडून नेल्याबाबतची तक्रार परिक्षेत्र वन अधिकारी यांच्याकडे दिनांक २७ एप्रिल, २०२२ रोजी तसेच मा.पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे परिक्षित श्री.अभिमन्यू खामकर यांनी माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-११-२०२३) :** (१) मौजे शिरगांव आडी, ता. जि. रत्नागिरी येथे प्रत्यक्ष जागेवर जावुन चौकशी केली असता फणस-०५, आंबा-०६, पुनई-०१ व आंबा कलम-०२ अशी एकुण १४ झाडे तोड केल्याचे निदर्शनास आले.

श्री. परिक्षीत अभिमन्यू खामकर, यांना मौजे. आडी, ता.जि.रत्नागिरी येथील जमिनीवरील झाडे विनापरवाना तोडून चोरुन नेल्याची तक्रार मा. मंत्री महोदय, मंत्रालय, पर्यावरण आणि हवामान बदल, यांचेकडे मे २०२२ मध्ये केली होती.
(२) सदर प्रकरणी वनपाल,पाली यांचेमार्फत चौकशी झाली असून, याप्रकरणी पाच जणांनी विनापरवाना वृक्षतोड केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार त्यांच्यावर महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम,१९६४ व महाराष्ट्र महसूल /झाडे इत्यादीच्या बाबतीतील अधिकारांचे नियमन नियम १९६७ अन्वये दंडात्मक आदेश निर्गमित केलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आरे क्षेत्रामधील अंतर्गत रस्त्यांच्या सिमेंट कॉंक्रिटीकरण्याच्या कामांकरिता निधीची तरतुद करण्याबाबत.**

**(१८) ६५३७५ (०३-०९-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील गोरेगांव (पूर्व) येथील पूर्व आणि पश्चिम द्रुतगती महामार्गांना जोडणाऱ्या आरे वसाहतीतील रस्ता मागील पावसाळ्यात वाहून गेल्यानंतर सदरहू रस्ता दुरुस्ती कामासंदर्भात मा.न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेवर कार्यकारी अभियंता, आरे दुग्ध वसाहत यांनी शासनास सादर केलेल्या १७४ कोटी रुपयाच्या प्रस्तावास शासनाने निधी अभावी प्रलंबीत ठेवला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त दुरावस्था झालेल्या रस्त्याच्या विकासाची काम करण्याच्यादृष्टीने शासनाने सदरहु प्रलंबीत प्रस्तावास मान्यता देऊन व निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त प्रलंबित रस्त्याच्या प्रस्तावास मंजूरी दिली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, व किती कालावधीत सदरहू प्रलंबित रस्त्यास शासनाकडून मंजुरी मिळणे अपेक्षित आहे,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०३-११-२०२३) :**(१) हे खरे नाही.
आरे वसाहतीमधील अंतर्गत रस्त्याच्या डांबरीकरणासाठी रु.४८ कोटी व कॉंक्रिटीकरणाकरिता रु.१४७ कोटी खर्चाचे प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागास सादर केले असता सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे फक्त डांबरीकरणासाठी रु.४८ कोटी खर्चाच्या प्रस्तावास तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. त्यासअनुसरुन शासन निर्णय दि.२/६/२०२३ अन्वये रु.४८ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.
(२) व (३) आरे दुग्ध वसाहतीतील अंतर्गत रस्ते फक्त देखभाल व दुरुस्तीसाठी बृहन्मुंबई महानगर पालिकेकडे दि.६/६/२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये हस्तांतरण करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने सदर रस्ते बृहन्मुंबई महानगर पालिकेकडे फक्त देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरण करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## स्वराज्याचे संकल्पक शहाजी राजे भोसले यांच्या समाधीची झालेली दुरवस्था

**(१९) ६५६१५ (२४-०८-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) होदीगेरे (ता.चन्नागिरी,जि.दवणगिरी) येथील स्वराज्याचे संकल्पक व छत्रपती शिवाजी महाराज यांचे पिता शहाजी राजे भोसले यांच्या कर्नाटकातील समाधी जीर्णोद्धारअभावी असल्याचे माहे एप्रिल , २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, राज्य शासनाने कर्नाटक शासनाशी समन्वय साधून शहाजी राजे यांच्या समाधीचा जीर्णोद्धार करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,
३)असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०२-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
शहाजी राजे भोसले यांची समाधी ही केंद्र संरक्षित स्मारक असून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, बंगलोर मंडळ यांच्या अखत्यारीत आहे. सदर समाधी जतन संवर्धनाच्या दृष्टीकोनातून उत्तम अवस्थेत आहे. मूळातच स्मारकाच्या बांधकामात छत्री/छत व्यवस्था नसल्याने समाधी उघडी आहे.
(२) सदर स्मारक स्थानिक राज्य शासनाच्या अखत्यारीत नसून केंद्र शासनाच्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, बंगलोर मंडळाच्या अखत्यारीत आहे.
(३) मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांच्या निर्देशानुसार संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय यांनी दि.१८.०८.२०२१ रोजी स्मारकास भेट दिली. भारतीय पुरातत्व सर्वेक्षणच्या निकषानुसार स्मारक परिसरात कोणतेही आधुनिक काम प्रस्तावित करता येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात "मागेल त्याला शेततळे" या योजनेपासून हजारो शेतकरी वंचित असल्याबाबत

**(२०) ६५६४१ (२४-०८-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पर्जन्यावर आधारित कोरडवाहू शेतीसाठी पाणलोट व जलसंवर्धन माध्यमातून जलसिंचनाची उपलब्धता वाढविण्याकरिता तसेच संरक्षित व शाश्वत सिंचनाची सुविधा निर्माण करण्यासाठी सन २०१६ पासून 'मागेल त्याला शेततळे' ही योजना राबविली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचा विस्तार करण्याची घोषणा सन २०२२-२३ मध्ये मा.कृषी मंत्री यांनी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेपासून हजारो शेतकरी वंचित असल्याचेही माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू योजनेत सुलभता येण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०६-११-२०२३) : (**१) होय. हे खरे आहे.

नियोजन विभागाच्या दि.१७ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली "मागेल त्याला शेततळे" योजना एप्रिल,२०२० पर्यंत कार्यान्वित होती.

(२) मा. वित्त मंत्री महोदयांनी सन २०२३-२४ चा अर्थसंकल्प सादर करताना केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये मागेल त्याला शेततळे योजनेचा विस्तार करण्यात येत असून, आता मागेल त्याला फळबाग, ठिबक / तुषार सिंचन, शेततळे, शेततळ्याचे अस्तरीकरण, शेडनेट, हरितगृह, आधुनिक पेरणीयंत्रे (BBF) व कॉटन श्रेडर हे घटक उपलब्ध करुन देण्याबाबत घोषणा केली आहे.

सदर योजनेस दि.१८/१०/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये "छत्रपती शिवाजी महाराज कृषि योजना" असे नाव देण्यात आले आहे.

(३) व (४) महा-डीबीटी प्रणालीवर सदर योजनेची अंमलबजावणी करण्यात येत असून शेतकऱ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा देण्यात आली आहे. त्यानुसार सर्व इच्छूक अर्जदार शेतकऱ्यांना लाभ देण्यात येत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज कृषि योजनेंतर्गत शेततळे घटकासाठी दि.१३ ऑक्टोबर, २०२३ रोजीपर्यंत ४०२५ शेततळे पूर्ण झाले असून रु.२६.४८ कोटी निधी खर्च झाला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजनेंतर्गत मजूरांनी मागणी करुनही काम उपलब्ध नसल्याबाबत

**(२१) ६५६९४ (२५-०८-२०२३). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजनेंतर्गत कोणकोणती कामे हाती घेण्यात आली असून, काही ठिकाणी मजूरांनी मागणी करुन सुध्दा त्यांना काम उपलब्ध करुन देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत किती कामे सुरु असून सदर कामावर किती मजूर काम करीत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (३०-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सातारा जिल्ह्यात मग्रारोहयो अंतर्गत ग्रामपंचायत विभाग व शासकीय यंत्रणामार्फत बांबू लागवड, रेशीम उद्योग, रोपवाटिका, वृक्षलागवड, फळबाग लागवड, घरकुल, शोषखड्डे, शौचालय, मातोश्री पाणंद रस्ते, सिंचन विहिरी, रेन

वॉटर हार्वेस्टींग, गुरांचे गोठे, शेततळे, शाळा भौतिक विकासाची कामे, व्हर्मी कंपोस्ट, नाडेप खत, पेव्हर ब्लॉक ही कामे सुरू आहेत.
(२) सातारा जिल्ह्यात मग्रारोहयो अंतर्गत वैयक्तिक
व सार्वजनिक स्वरुपाची १३५९४ कामे प्रगतीपथावर असुन दि. २४/०८/२०२३ ते दि. ३०/०८/२०२३ या कालावधीमध्ये एकूण ४९७ कामांपैकी ३०६ कामे सुरू होती. याकरिता ३४९७ मजूर उपस्थिती असून २०९७९ इतकी मनुष्यदिन निर्मिती झालेली आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**मौजे शेलगाव (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत केळी कामगार प्रशिक्षण केंद्रामध्ये रुपांतर करण्याबाबत**

**(२२) ६५७९८ (२५-०८-२०२३). श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे शेलगाव (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या अंतर्गत असलेल्या कोरडवाहू संशोधन केंद्राचे केळी संशोधन केंद्र शेतकरी व प्रशिक्षण केंद्र व निर्यातक्षम केळी कामगार प्रशिक्षण केंद्रामध्ये रुपांतर करण्याबाबतचा प्रस्ताव संचालक (संशोधन) महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांनी सहसंचालक फलोत्पादन कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०२-११-२०२३) :** (१) होय हे खरे आहे,
(२) राज्यातील जास्तीत जास्त क्षेत्र कोरडवाहू पिकाखाली असल्याने आणि अन्नधान्य उत्पादन याच क्षेत्रात होत असल्याने कोरडवाहू संशोधन केंद्र, शेलगाव हे कृषि विद्यापीठ संशोधनासाठी महत्वपूर्ण आहे. त्यामुळे सदर कोरडवाहू संशोधन केंद्राचे केळी संशोधन केंद्र, तसेच, शेतकरी प्रशिक्षण केंद्र व निर्यातक्षम केळी कामगार प्रशिक्षण केंद्रामध्ये रुपांतर करणे संयुक्तिक होणार नाही, असे अभिप्राय महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी दिलेले आहेत. सद्य:स्थितीत राज्यात जळगाव व नांदेड या ठिकाणी केळी संशोधन केंद्र अस्तित्वात आहे. सदर केंद्रामार्फत केळी पिकाबाबतचे विस्तार कार्य, प्रशिक्षण शेतकऱ्यांना देण्यात येत आहे. मौजे शेलगाव, ता.करमाळा, जि.सोलापूर येथे तालुका बीजगुणन केंद्र व तालुका फळरोपवाटीका कार्यरत असून सदर क्षेत्रावर केळी संशोधन केंद्र, शेतकरी प्रशिक्षण केंद्र व निर्यातक्षम केळी कामगार प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबतची बाब तपासण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथे वन हक्क कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी मोर्चा काढण्यात आल्याबाबत**

**(२३) ६६३६९ (२४-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) येथे वन हक्क कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी श्रमिक मुक्ती दल आणि सत्यशोधक डेमोक्राटिक पार्टीच्यावतीने दिनांक ४ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास प्रांत कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वन हक्क कायद्याच्या अंमलबजावणीसंदर्भात शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-११-२०२३) :**(१) हे खरे आहे.
(२) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम, २००८ व सुधारणा नियम, २०१२ मधील तरतूदीनुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यात जिल्हास्तरीय समिती व उपविभाग स्तरीय समिती गठीत करण्यात आलेली आहे. सावंतवाडी उपविभागस्तरीय वनहक्क समितीकडे प्राप्त झालेल्या एकूण २९ वनहक्क दाव्यांची वनहक्क कायद्यानुसार पडताळणी करून त्यामध्ये आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत संबंधिताना सावंतवाडी उपविभागस्तरीय कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात खते व दर्जेदार बियाणे उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२४) ६६५१० (२७-०८-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात यंदाच्या खरीप हंगामात लागवडीखाली क्षेत्र वाढविण्यासाठी शेतकऱ्यांना मुबलक प्रमाणात खते व दर्जेदार बियाणे उपलब्ध करुन देण्याबाबची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याशिवाय शेतकऱ्यांना कृषी पतपुरवठा, पिक विमा संरक्षण देणेही गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच इगतपुरी त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) तालुक्यातील खरीप हंगामासाठी लागणारी खते बी-बियाणे यांचा सुरळीत पुरवठा व शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नाशिक जिल्हा कृषि अधिकाऱ्यांकडे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) त्याचप्रमाणे लोहा (जि.नांदेड) परिसरातील शेतकऱ्यांची खते व बियाणांची जुळवाजुळव करण्यासाठी तसेच बाजारपेठेत व्यापारी खते-बियाणांची टंचाई असल्याच्या नावाखाली सदरहू शेतकऱ्यांची आर्थिक लूट करीत असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या सर्व प्रकरणाची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०२-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) नाशिक जिल्हयातील इगतपुरी तालुक्यात एकूण १०८ कृषि सेवा केंद्राची निरीक्षकामार्फत तपासणी करण्यात आली आहे. त्यामध्ये १ खत परवाना निलंबित करण्यात आला आहे. त्र्यंबकेश्वर तालुक्यात एकूण ५३ कृषि सेवा केंद्राची तपासणी करण्यात आली आहे. नाशिक जिल्हयात एकूण १७ भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. या भरारी पथकामार्फत माहे जून अखेर एकूण ७५३३ विक्री केंद्राच्या तपासण्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये त्रुटी आढळून आलेले खते, बियाणे व किटकनाशके असे २५ परवाने निलंबन करण्यात आले आहे. नाशिक जिल्हयात एकूण २,६६,३८१ मे. टन एवढा खत साठा खरीप हंगाम २०२३ साठी उपलब्ध करण्यात आला. तसेच, नाशिक जिल्हयात खरीप हंगामाकरीता १,०२,४५१ क्विंटल बियाण्यांचा पुरवठा केला आहे. राज्यात खरीप हंगाम २०२३ मध्ये रासायनिक खताचे एकूण ६०.८५ लाख मे. टन खत उपलब्ध झाले आहे.

नांदेड जिल्हयातील लोहा तालुक्यातील ३६ निविष्ठा विक्रेत्यांची तपासणी करण्यात आली असून दोन बियाणे विक्रेत्यांचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत. तसेच, नायगाव तालुक्यातील कोलंबी येथे विनापरवाना व बेकायदेशीर सोयाबीन बियाण्यांची विक्री होत असल्यामुळे एका बियाणे कंपनीविरुध्द पोलिस गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यात मजगी (बांध) प्रकल्पासाठी कृषी विभागाने खर्च केलेल्या रकमेची चौकशी करण्याबाबत**

**(२५) ६६५८६ (२७-०८-२०२३). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यात कृषि विभागांतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात मजगी (बांध) प्रकल्पासाठी कृषी विभागाने किमान १४ कोटी रुपये खर्च केला असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निम्मा खर्च हा माहे मार्च, २०२३ महिन्याच्या शेवटच्या आठ-दहा दिवसांत झाल्यामुळे प्रत्यक्षात कामे न करता कोट्यवधी रुपयांचा खर्च झाला असल्याने या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याने याबाबत पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी चौकशी करण्याचे आदेश कृषि विभागाला दिले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी मजगीच्या निविदा ऑनलाईन पध्दतीने मागवल्या जातात, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच उक्त जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या शेतात कृषी विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या योजनानिहाय शेततळे तपासण्याचे काम हाती घेऊन या योजनेच्या कामाची चौकशी करण्याबाबतची मागणी ‘समर्थन’ संस्थेने मा.मुख्यमंत्री, मा.कृषी मंत्री व प्रधान सचिव (कृषि विभाग) यांच्याकडे दिनांक २९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार दोषी आढळणाऱ्या अधिकारी व ठेकेदार यांच्यावर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०६-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
मजगीच्या निविदा ऑनलाईन पध्दतीने मागविल्या जातात. तथापि, महात्मा गांधी रोजगार हमी योजने अंतर्गत करणेत येणारी मजगीची कामे निविदा न मागविता मागणी प्रमाणे मजुरांमार्फत करणेत येतात.
(४) हे खरे आहे.
(५) दि.२६.०५.२०२३ च्या लेखी निवेदन/तक्रारीसंदर्भात प्राथमिक चौकशी करुन चौकशी अहवालाची प्रत अभिप्रायांसह सादर करण्याबाबत आयुक्त (कृषि) यांना दि.१२.०७.२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यास अनुसरुन संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन कार्यालय यांच्या दि.०२.०८.२०२३ च्या पत्रान्वये दक्षता पथक, कृषि आयुक्तालय, पुणे यांना सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मनोर (जि.पालघर) येथील वन विभागाच्या राखीव वनाच्या जागेत मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल केल्याबाबत

**(२६) ६६७०१ (११-०९-२०२३). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर (जि.पालघर) येथील वनपरिक्षेत्र कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कुडे गावच्या हद्दीत मुंबई-अहमदाबाद महामार्ग जवळच्या राखीव वनाच्या जागेत अतिक्रमण करुन मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल केल्याने वनव्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी मनोर वन परिक्षेत्र कार्यालयाकडे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त अतिक्रमाणाकरिता कत्तल केलेल्या झाडांची खोडे दिसू नये याकरिता पाने टाकून झाडाची खोडे झाकून ठेवण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात जंगलाचा ऱ्हास सुरु असताना झाडांच्या रक्षणांची जबाबदारी असलेले वनविभागाचे संबंधित कर्मचारी जाणीवपूर्वक याकडे दुर्लक्ष करुन वन माफिया विरोधात कोणतीही कारवाई करीत नसल्याची तक्रार उक्त निवेदनात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार वन माफियांना पाठीशी घालणाऱ्यावर तसेच अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-११-२०२३) :** (१) सदर प्रकरणी श्री. नितेश हरिश्चंद्र पाटील, रा.कुडा, अध्यक्ष संयुक्त वनव्यवस्थापन समिती,कुडे यांचा दि. ०१.०५.२०२३ रोजी डहाणू वन विभागाकडे तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.

सदर प्रश्न मनोर वनपरिक्षेत्राशी संबंधीत नसून तो दहिसर वनक्षेत्रातील कुडा परिमंडळातील कुडे नियतक्षेत्राशी संबंधीत आहे. मौजे कुडे येथील क्षेत्र हे राखीव वन नसुन संरक्षित वन असे आहे.

(२) वनक्षेत्रपाल दहिसर यांनी तक्रार अर्जाच्या अनुषंगाने चौकशी केली असून,चौकशी अहवालानुसार अशा प्रकारची घटना घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) वन विभागाचे कर्मचारी हे जंगलामध्ये नियमित फिरती, रात्र गस्त करीत असतात, कोणताही गुन्हा आढळून आल्यास नियमानुसार तात्काळ कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालम (जि.परभणी) तालुक्यातील शेतकरी सर्वेक्षण पथकातून शिक्षकांना वगळण्याबाबत

**(२७) ६६८३५ (२५-०८-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालम (जि.परभणी) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक सुरक्षेबाबतची पाहणी करण्यासाठी शासनाने ८० गावांमध्ये कृषी गणना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातील सर्वेक्षण करण्यासाठी दिनांक १५ मे, २०२३ पर्यंत मुदत देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकरी सर्वेक्षण पथकातून शिक्षकांना वगळण्याची मागणी दिनांक १८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास तहसीलदारांकडे डॉ.पंजाबराव देशमुख शिक्षक परिषदेने लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शिक्षक परिषदेच्या मागणीच्या अनुषंगाने निर्णय घेण्यात आला आहे काय तसेच आतापर्यंत किती शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०६-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
पालम तालुक्यातील ८० गावाचे शेतकरी सर्वेक्षण चे काम सुरु आहे.
(२) होय.
(३) नाही.
(४) पालम तालुक्यातील ८० गावाचे शेतकरी सर्वेक्षणसाठी ग्रामसेवक ४५, कृषी सहायक १६ व तलाठी १९ यांचे आदेश काढण्यात आले आहेत. तसेच पालम तालुक्यातील १३९०७ शेतकरी कुटुंब सर्वेक्षणाचे काम पुर्ण केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाघेरा (ता.त्र्यंबकेश्वर) या घाटात वन विभागाच्या वृक्षांची तोड होत असल्याबाबत

**(२८) ६७४९६ (२८-०८-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाघेरा (ता.त्र्यंबकेश्वर) या घाटात वन विभागाच्या वनसंपत्तीची कुऱ्हाडीने चुकीच्या पद्धतीने तोड होत असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, यासंदर्भात चुकीच्या पद्धतीने वृक्षतोड करणाऱ्यांना अटक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-११-२०२३) :** (१) वाघेरा (ता. त्रंबकेश्वर) या घाटात वन विभागाच्या वनसंपत्तीची कुऱ्हाडीने चुकीच्या पध्दतीने तोड होत असल्याच्या घटना माहे जुन २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आलेल्या नाहीत.

मात्र मागील ३ वर्षात सन २०२०-२१ मध्ये ०३ वृक्षतोडीची घटना तसेच सन २०२१-२२ मध्ये निरंक सन २०२२-२३ मध्ये ०५ तसेच सन २०२३-२४ मध्ये ०६ घटना निदर्शनास आल्या होत्या. त्याच्यांकडून वन अधिनियमानुसार दंड वसुली करण्यात आलेली आहे.
(२) अवैध वृक्षतोड निदर्शनास आल्यास वनगुन्हा दाखल करुन त्याची चौकशी करण्यात येते.
(३) वन कर्मचाऱ्यांमार्फत वनांमध्ये दिवस व रात्रीचे गस्त वाढवण्यात आली असुन आरोपीवर गुन्हा दाखल करुन नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अनेक दुग्ध योजना बंद असल्याबाबत

**(२९) ६७७९८ (२८-०८-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील तब्बल २४ दूध योजना, ६५ शीतकरण केंद्र बंद पडल्या असल्यामुळे त्याची कालबाह्य झालेली यंत्रसामुग्री भंगारात काढण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे दिनांक ७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त यंत्रसामुग्रीच्या विक्री प्रक्रियेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०३-११-२०२३) :** (१) पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या दि.१५/०२/२०२२ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार निर्लेखनाची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे.

(२) दि.१५/०२/२०२२ रोजीच्या परिपत्रकाचे अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित शासन पुरकपत्रानुसार निकामी/निरुपयोगी घोषित करण्यात आलेल्या यंत्रसामुग्रीच्या विक्रीची कार्यवाही ई-निविदा प्रक्रिया राबवून करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना अंतर्गत पालघर जिल्हयास मंजूर झालेला निधी वाढवून मिळण्याबाबत

**(३०) ६८१४१ (०३-०९-२०२३). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गावपाड्यांच्या विकासासाठी महत्त्वाची असणारी ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना सुरू झाली असताना पालघर जिल्ह्याला केवळ ६ कोटी २१ लक्ष रुपये मंजूर झाले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर जिल्ह्यांच्या तुलनेत पालघर जिल्ह्याचा विकास पुरेश्या निधीअभावी झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालघर जिल्ह्याचा विकास करण्याच्या दृष्टीने मंजूर झालेला अपुरा निधी वाढवून मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-११-२०२३) :** (१), (२) व (३) पालघर जिल्हयांतर्गत जव्हार व डहाणू हे दोन प्रकल्प कार्यांलयाचा समावेश होतो. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, दि.०३ फेब्रुवारी २०२३ अन्वये ठक्कर बाप्पा योजना सन २०२२-२३ पासून जिल्हास्तर व राज्यस्तरावरुन राबविण्याबाबतच्या सुधारीत मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुषंगाने शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग दि.०७ फेब्रुवारी २०२३ अन्वये सन २०२२-२३ वर्षाकरीता आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात पालघर जिल्ह्यांतर्गत प्रकल्प अधिकारी, डहाणू व जव्हार करीता रू. १३,२९,६६,८५८/- इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला होता.
पालघर जिल्ह्यामधील जव्हार व डहाणू या दोन प्रकल्प कार्यालयांतर्गत ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत सन २०२२-२३ मध्ये एकूण रु.१२,८५,१६,८००/- इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू (जि. पालघर) येथील डोंगराळ भागातील आदिवासी कुटुंबे गेल्या अनेक वर्षांपासून शासनाच्या घरकुल योजनेपासून वंचित असल्याबाबत

**(३१) ६८१५४ (१०-१०-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि. पालघर) येथील डोंगराळ भागातील शेकडो आदिवासी कुटुंबे अनेक वर्षांपासून शासनाच्या घरकुल योजनेपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी `समर्थन' संस्थेने मंत्री, अवर सचिव, आदिवासी विकास विभाग यांच्याकडे दिनांक १९ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१८ मध्ये डहाणु तालुक्यात २७ हजार ६०२ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले असून त्यापैकी ३ हजार ४९९ कुटुंबे अपात्र ठरविण्यात आल्याने या अपात्र गरीब आदिवासी कुटुंबांसाठी त्यांच्या हक्काचे घर मिळावे म्हणून शबरी आदिवासी आवास योजना, प्रधान मंत्री घरकुल योजना राबविण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन, त्यानुषंगाने शासनाच्या घरकुल योजनेपासून वंचित असलेल्या आदिवासी बांधवांना सदर योजनेचा लाभ तातडीने मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-११-२०२३) :** (१) हे खरे नाही,
डहाणू तालुक्यात सन २०१६-१७ ते सन २०२२-२३ पर्यंत प्रधामंत्री आवास योजना, शबरी आदिवासी घरकुल योजना व आदिम जमाती आवास योजनेतंर्गत आदिवासी कुटुंबांसाठी एकूण १०८३२ घरकुले मंजूर करण्यात आलेली आहेत.
(२) डहाणू तालुक्यातील सन २०१८ मध्ये प्रधानमंत्री आवास योजनेसाठी केलेल्या सर्वेक्षणातील अपात्र ठरलेल्या आदिवासी कुटुंबांना घरकुल उपलब्ध करून देण्याबाबतचे समर्थन संस्थेद्वारा दि.१९.०४.२०२३ रोजीचे निवेदन आदिवासी विकास विभागास प्राप्त झालेले आहे.
(३) व (४) केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेच्या केलेल्या पुन: सर्वेक्षणामध्ये ३३९६ कुटुंबे तांत्रिक कारणांमुळे अपात्र ठरविण्यात आली होती व पात्र ११९१ कुटुंबांपैकी १३३ लाभार्थ्यांना शबरी आदिवासी घरकुल व आदिम आवास योजनेतून लाभ देण्यात आलेला आहे.
शासन निर्णय, दि.०२ जून, २०२३ अन्वये शबरी आदिवासी घरकुल योजनेतंर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी राज्यातील ग्रामीण भागाकरीता १,०७,०९९ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले असून पालघर जिल्ह्यासाठी ४२२२ घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यापैकी एकात्मिक आदिवासी प्रकल्प, डहाणू साठी १०५० एवढे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात काही जिल्ह्यात शेतीशाळांत कृषी उत्पादकेवर भर पडण्यासाठी आवश्यक बाबींचे प्रशिक्षण देण्याबाबत

**(३२) ६८४८१ (२७-०८-२०२३). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अमरावती जिल्ह्यासह शेतकरी बांधवांना शेतातील पिकाविषयी प्रत्यक्ष माहिती व मार्गदर्शन देणारी शेतीशाळा प्रभावी माध्यम असल्याचा दावा करुन या शेतीशाळेत मार्गदर्शन करणाऱ्यांना देण्यात येणारे प्रशिक्षण हे सन २०१४ या कालावधीपासून बंद केले असल्याने शेतीशाळातून शेतकऱ्यांना अप्रशिक्षीत कर्मचाऱ्यांकडून मार्गदर्शन केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याशिवाय ज्या पिकासाठी शेतकऱ्यांना खरेच शेतीशाळेच्या माध्यमातून पिक संरक्षणासाठी मार्गदर्शनाची गरज आहे असे विषय या शाळेत जाणीवपूर्वक टाळले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच शेतकऱ्यांना विविध प्रकारचे मार्गदर्शन करुन शेतकरी स्वावलंबी होण्याकरीता शासनाने सुरु केलेल्या शेतीशाळा मध्ये या वर्षी वाढ करण्यात येऊन संपूर्ण राज्यात १७ हजार शेतीशाळा नियोजित असून त्यामध्ये फक्त कोकणात दीड हजार शेतीशाळा दिनांक २४ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास सुरु करण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) त्याचप्रमाणे कोकण, नाशिक, पुणे, कोल्हापूर, नागपूर, छ. संभाजीनगर, लातूर, अमरावती या विभागात घेण्यात येणाऱ्या शेतीशाळाचा उपयोग व फायदा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना होण्याकरीता कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, खरीप व रब्बी हंगामा करीता वर्षातून २ वेळा या शेतीशाळाचे आयोजन करणे तसेच राज्यातील फलोत्पादन व दूध उत्पादन वाढीसाठी शेतीशाळा सारख्या शाळा सुरु करण्याबाबत शासनाने माहिती घेवून या शेतीशाळांत कृषी उत्पादकेवर भर पाडण्यासाठी आवश्यक बाबींचे प्रशिक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०३-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

प्रवर्तकांचे दिर्घ मुदतीचे प्रशिक्षण (TOF) शेतीशाळेत मार्गदर्शन करणा-या प्रवर्तकांना सन २०१४ पर्यंत देण्यात आले आहे. तसेच ज्या प्रवर्तकांना (प्रशिक्षित अधिकारी व कर्मचारी) सदर प्रशिक्षण देणेत आलेले आहे. त्यातील प्रत्येक जिल्ह्यातील २० प्रवर्तकांना सन २०२२-२३ पर्यंत रामेती (विभागीय प्रशिक्षण संस्था ) मार्फत दोन दिवसाचे उजळणी प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. शेतीशाळा राबविण्याच्या दृष्टीने प्रवर्तकांचे दिर्घ मुदतीचे प्रशिक्षण (TOP) पुर्ण केलेल्या प्रवर्तकांद्वारे दरवर्षी सर्व कृषि सहाय्यक यांना एक दिवसीय ऑफलाईन शेतीशाळेचे प्रशिक्षण देण्यात येते व त्यानंतरच शेतीशाळा घेण्यात येतात. त्यामुळे प्रवर्तकांमार्फत शेतीशाळा घेणारे अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षित झालेले आहेत.
(२) हे खरे नाही.

शेतीशाळेमध्ये कृषि सहाय्यकांमार्फत आवश्यकतेनुसार प्रत्येक प्रशिक्षण वर्गात प्रत्यक्ष प्रात्यक्षिके तथा प्रशिक्षण या माध्यमातुन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण संबंधित शेतकऱ्यांना देण्यात येते तसेच त्या आठवड्यातील पिक परिस्थितीनुसार योग्य सल्ला व पिकावरील प्रमुख किड रोगांची ओळख व त्यावरील उपाययोजना, कृषि संदेश, योजनांची माहिती या शेतीशाळांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना देण्यात येते.
(३) सन २०२३-२४ मध्ये खरीप व रब्बी हंगामाकरीता एकूण १५६६७ शेतीशाळा राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. कोकण विभागामध्ये सन २०२२-२३ मध्ये विविध योजनेंतर्गत खरीप व रब्बी हंगामामध्ये १२६३ शेतीशाळा राबविण्यात आलेल्या आहेत व चालू वर्षी खरीप हंगामामध्ये विविध योजनेंतर्गत ६९७ शेतीशाळा सुरु आहेत.
(४) सर्व विभागात खरीप व रब्बी हंगामामध्ये आयोजित करण्यात येत असलेल्या शेतीशाळेतील ५ ते ६ वर्गांमध्ये पिक वाढीच्या अवस्थेनुसार पिकांच्या पेरणी पूर्व ते काढणी पश्चात प्रत्यक्ष प्रात्यक्षिक तथा प्रशिक्षणाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ करणेबाबत मार्गदर्शन करण्यात येते. तसेच पिक परिस्थितीनुसार योग्य सल्ला, पिकावरील विविध किडी व रोग यांची ओळख व त्यावरील उपाययोजना, मित्र कीटक व त्यांचे शेतीतील महत्त्व, विविध कृषि संदेश याबाबत शेतकऱ्यांना माहिती दिली जाते.
(५) राज्यात खरीप व रबी हंगामाकरीता वर्षातून २ वेळा या शेतीशाळेचे आयोजन करण्यात येते. तसेच फळ पिकांसाठी हॉर्टसॅप योजनेंतर्गत शेतीशाळा राबविण्यात येत असून शेतीशाळांत कृषि उत्पादकेवर भर पाडण्यासाठी प्रवर्तकांचे दिर्घ मुदतीचे प्रशिक्षण (TOF) पूर्ण केलेल्या प्रवर्तकांद्वारे तसेच कृषी विद्यापीठ व कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ यांच्या मार्फत शेतीशाळा राबविण्याच्या दृष्टीने सर्व कृषि सहाय्यक यांना एकदिवसीय ऑफलाईन शेतीशाळेचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.
(६) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**मौजे धारवाडा, कौंडण्यपूर व छिंदवाडी (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील जमीन अधिग्रहणाचा मोबदला मिळाला नसल्याबाबत**

**(३३) ६८४९३ (११-०९-२०२३).ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर),श्रीमती प्रतिभा**

**धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :**सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे धारवाडा, कौंडण्यपूर व छिंदवाडी (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील शेतकऱ्यांची जमीन निम्न वर्धा प्रकल्पाने भूसंपादित केलेली असून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना अद्यापही जमीन अधिग्रहणाचा मोबदला मिळाला नसल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधीत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना अद्यापही जमीन अधिग्रहणाचा मोबदला दिला नसल्याने त्यांनी दिनांक ११ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास बेमुदत उपोषण केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन जमीन अधिग्रहणाचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३०-१०-२०२३) :**(१) मौजा कौडण्यपूर, मौजा धारवाडा व मौजा शिदवाडी, ता. तिवसा, जि. अमरावती या भूसंपादन प्रकरणात अंतिम निवाडा अनुक्रमे दिनांक ०२ मे २०२३, ०८ मे २०२३ व ०४ मे २०२३ रोजी घोषित करुन, निवाडा रक्कम माहे जून २०२३ मध्ये भूधारकांना अदा करण्यात आली आहे.
(२), (३) व (४) प्रस्तुत भूसंपादन प्रकरणानुषंगाने भूधारकांनी दिनांक २७.०३.२०२३ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन देऊन दिनांक १२.०४.२०२३ पासुन उपोषण सुरु केले. त्यानुषंगाने संपादन संस्थेचे अधिकारी व भूसंपादन अधिकारी यांचेसमवेत शेतक-यांना समजावुन उपोषण सोडविण्यात आले. निवाडा रक्कम संबंधितांना अदा केली असल्याने चौकशी करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

---

## बीड ते शिरुर (का.) येथे शेतकऱ्यांना कृषी अनुदान वाटप करण्याबाबत

**(३४) ६८५५६ (२७-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड व शिरुर (का.) तालुक्यातील सर्व पिकांवरील विविध योजनेतील शेतकरी बांधवांना देण्यात आलेले कृषी वाटप तपशील, शेतकऱ्यांचे नाव, गाव, क्षेत्रनिहाय देण्याबाबत तसेच अनुदान तपशील देताना सन २०१९ ते २०२३ या कालावधीमध्ये ग्राह्य धरण्यात यावा, अशी मागणी केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा कृषी अधिक्षक, कृषी अधिकारी यांनी वेळोवेळी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नासंदर्भात नियमोचीत पत्र व्यवहार झाला असून जिल्हा कृषी कार्यालयाकडून वेळोवेळी पत्राचे अनुपालन, शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शेतकऱ्यांना अनुदान वाटप न करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०५-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

मा. लोकप्रतिनिधींनी त्यांच्या दि. ०४.०८.२०२१, दि. १३.०९.२०२१, दि. ०३.१०.२०२१, दि. ११.११.२०२१ च्या पत्रान्वये मागितलेली प्रशासकीय व तांत्रिक स्वरुपाची माहिती जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बीड यांच्या कार्यालयाने तसेच अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांनी दि. ०९.१०.२०२१, दि. ११.११.२०२१, दि. १२.११.२०२१ व दि. १५.१२.२०२१ च्या पत्रान्वये सादर केली आहे.

तालुका कृषि अधिकारी, बीड यांच्या कार्यालयाच्या जा.क्र.ताकृअ/तां/कृअ/४०६/२०२३ दि. १४.०३.२०२३ रोजीच्या पत्रान्वये विविध योजनांतर्गत शेतकरी निहाय झालेला अनुदान वितरण व अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांचा तपशील यांची माहिती संबंधित मा. लोकप्रतिनिधी यांना दिली आहे. तसेच उपविभागीय कृषि अधिकारी, बीड यांच्या

कार्यालयाच्या क्र. आस्था/अ.वा. माहिती/८५८/२०२३ दि. ३०.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये बीड व शिरुर (कासार) तालुक्यातील सन २०१९ ते माहे मे, २०२३ या कालावधीतील सर्व पिकांवरील विविध योजनेतील शेतकरी बांधवांना दिलेल्या अनुदानाचा तपशील, शेतकऱ्याचे नाव, गाव, क्षेत्रनिहाय माहिती संबंधित मा. लोकप्रतिनिधी यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(३) कृषि विभागामार्फत विविध योजनेतंर्गत महाडीबीटी पोर्टलव्दारे योजनांची अंमलबजावणी व अनुदानाचा लाभ देण्यात येत असल्यामुळे, सोडत पध्दतीने निवडलेल्या पात्र लाभार्थी अर्जदार शेतकऱ्यांना अनुदानाचा लाभ देण्यात आलेला आहे.सर्व योजनेतंर्गत अनुदान ज्याप्रमाणे प्राप्त झाले, त्याच प्रमाणात वितरित करण्यात आलेले आहे. सदर प्रकरणी विलंब झालेला नसल्यामुळे कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) विलंब झालेला नाही.

---

**कृषि विभागातील नियमबाह्य बदल्यांबाबत**

**(३५) ६८६९० (२७-०८-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कृषि विभागातील बदल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता होऊन आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे माहे मे-जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषि संचालक, निविष्ठा व गुण नियंत्रण या पदावर नागरी सेवा मंडळाचा विरोध असतानाही एका विशिष्ट अधिकाऱ्यांची पद:स्थापना केली असून गुण नियंत्रण विभागातील जिल्ह्याच्या व विभागीय स्तरावरील पद:स्थापनेसाठी ही मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू बदली पात्र अधिकाऱ्यांकडून बदलीचे विकल्प मागविल्यानंतरही विकल्पातील जागा रिक्त असताना केवळ आर्थिक हीत संबंध न जोपासल्यामुळे त्यांची बदली विकल्पाबाहेरील जागेवर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात विकल्पाबाहेरील बदल्यांचा प्रस्ताव कृषि आयुक्तालयाने नाकारुन फेरसादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत उक्त विभागातील बदल्यांमध्ये झालेल्या गैरकारभाराची शासनाने चौकशी करुन दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०२-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
शासन निर्देशाच्या अनुषंगाने नागरी सेवा मंडळाची शिफारस घेऊन कृषि संचालक संवर्गातील कृषि संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण) आणि कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण) या पदावरील अधिका-यांचे बदली अधिनियम,२००५ मधील विहीत तरतुदीनूसार सक्षम प्राधिकाऱ्यांची मान्यता घेऊन दि.२७/०३/२०२३ रोजीच्या शासन आदेशान्वये बदली करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ आणि गट-ब मधील अधिका-यांच्या बदल्यांसंदर्भातही नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी आणि सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने सन २०२३ च्या सर्वसाधारण बदल्यांबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
(३) व (४) काही बदलीपात्र अधिकाऱ्यांनी रिक्त पदे नसलेल्या ठिकाणी पदस्थापना मिळण्याबाबत विकल्प दिले होते. नागरी सेवा मंडळाने अशा प्रकरणात प्रशासनिक निकड/क्षेत्रीय स्तरावरील कार्यकारी पदे भरण्याबाबत प्राधान्यक्रमाने विचार करून विकल्पामध्ये नमूद / विकल्पातील मुख्यालयाच्या नजिकचा तालुका/ जिल्हयामध्ये पदस्थापना देण्याबाबत

शिफारशी केल्या होत्या.तद्नुषंगाने बदली अधिनियम,२००५ मधील विहीत तरतुदीनूसार संबंधित प्रस्तावास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन कृषि विभागातील अधिकारी/कर्मचा-यांचे सन २०२३ या वर्षातील नियतकालीक बदल्यांचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील हजारो निविष्ठा परवाने प्रलंबित असल्याबाबत**

**(३६) ६८६९१ (२७-०८-२०२३). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी निविष्ठाचे परवाने ऑनलाईन करण्यासाठी विभागाची कार्यवाही सुरु असताना जवळपास २५ हजारावर परवाने प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परवान्यासाठी ‘महाआयटी’ मार्फत संगणक प्रणाली राबविण्यात येत असलेले परवानेही प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच खते, बियाणे व किटकनाशके यांची विक्री करण्यासाठी जिल्हास्तरामार्फत परवाने ऑनलाईन करण्यासाठी महाआयटीचे कर्मचारी उपलब्ध नसल्याचे तसेच आर्थिक देवाण-घेवाणी मुळेच परवाने प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत सद्य:स्थितीत जिल्हानिहाय किती निर्गमित व प्रलंबित परवाने वेळेमध्ये मंजूर करुन देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०२-११-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) महाआयटी कर्मचारी उपलब्ध नसणे हे अंशत: खरे आहे. परवाने ऑनलाईन देण्यात येत असल्याने यामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार निदर्शनास आलेला नाही.
(४ व (५) खते, बियाणे व किटकनाशके या कृषि निविष्ठांच्या उत्पादन, साठवणूक व विक्रीकरीता ऑनलाईन परवाने देण्यासाठी महाआयटी कंपनीकडून महा-परवाना प्रणाली विकसित करण्यात आली आहे. सदर प्रणाली विकसित झाल्यापासून त्यामध्ये सतत तांत्रिक अडचणी येत आहेत. तथापि, आतापर्यंत जिल्हानिहाय एकूण १,६६,८५४ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १,४२,८९२ अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. तसेच १५,१८४ अर्ज छाननीसाठी प्रलंबित आहेत आणि ६०५ अर्जांवर तांत्रिक अडचणींमुळे डिजीटल स्वाक्षरी झालेली नाही. यासंदर्भात, आयुक्त (कृषि) यांना जिल्हानिहाय आढावा घेवून प्रलंबित परवान्यांची छाननी करुन निकाली काढण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही

---

**चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी ई-पीक ॲपवर नोंदणी करुनही नोंदणी न झाल्याने शासनाने जाहिर केलेला बोनस न मिळाल्याबाबत**

**(३७) ६९०१६ (३१-०८-२०२३). श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील १ लाख २० हजार शेतक-यांनी ई-पीक ॲपवर नोंदणी करुनही नोंदणी न झाल्याने शासनाने जाहिर केलेला बोनस मिळाला नसल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-११-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.
चंद्रपूर जिल्ह्यात सन २०२२-२३ ई पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे खरीप + संपूर्ण वर्ष हंगामात १,१९,६९९ खात्याची १,६५,९४४.६८ हेक्टर क्षेत्रावर पीक पाहणी नोंद झालेली आहे व रब्बी + संपूर्ण वर्ष हंगामात ४५९८९ खात्याची ७८२८४.८९ हेक्टर क्षेत्रावर पीक पाहणी नोंद झाली असून सातबारा वर नोंद करण्यात आलेली आहे. तथापी ई-पीक पाहणी मोबाईल ॲपद्वारे नोंदवलेली ई-पीक पाहणी सातबाऱ्यावर दर्शविण्यात आलेली आहे.त्यामुळे नोंदणी न झाल्याने शासनाने जाहिर केलेला बोनस न मिळाल्याबाबत माहे एप्रिल २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहर व उपनगरात दूध वितरणाकरिता शासनाने दिलेले स्टॉल त्यांच्या किंवा वारसाच्या नावावर करण्याबबात

**(३८) ६९२११ (२४-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगरात दुध वितरण करण्यासाठी शासनाने १८०० स्टॉल दिले असून बृहन्मुंबई दुध योजनेच्या माध्यमातुन आरे, वरळी व कुर्ला या शासकीय दुध डेअरी मार्फत केला जाणारा दुध पुरवठा माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान बंद केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र दुध वितरण संघटनेने स्टॉल केंद्र चालकाच्या वारसास किंवा मदतनीसांच्या नांवावर हस्तांतरीत करण्याचे व इतर मागण्यांचे निवेदन दुग्धविकास मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्टॉल केंद्र चालकाच्या नांवावर हस्तांतरीत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०३-११-२०२३) :** (१) व (२) होय
(३) शासन पत्र दि.२६.४.२०२३ अन्वये मुळ परवाना धारकाच्या मृत्यु झाल्यास कायदेशीर (रक्ताचे नाते) वारसांपैकी पात्रता निकष पुर्ण करणाऱ्या वारसदारास परवाना हस्तांतरण करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील गोरेगांव (पूर्व) आरे दुग्ध वसाहतीतील पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गाला जोडणारे रस्ते व अंतर्गत रस्ते शासनाने महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत

**(३९) ६९२८७ (२४-०८-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील गोरेगांव (पूर्व) आरे दुग्ध वसाहतीतील पूर्व व पश्चिम द्रुतगती महामार्गाला जोडणारे रस्ते व अंतर्गत रस्ते शासनाने महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म.न.पा.ने रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती केली नसल्याचे माहे जुन, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०३-११-२०२३) :** (१) आरे दुग्ध वसाहतीतील अंतर्गत रस्ते फक्त देखभाल व दुरुस्तीसाठी बृहन्मुंबई महानगर पालिकेकडे दि.६/६/२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये हस्तांतरण करण्यासाठी मान्यता दिलेली आहे.
(२), (३) व (४) आरे दुग्ध वसाहतीतील अंतर्गत रस्ते फक्त देखभाल व दुरुस्तीसाठी बृहन्मुंबई महानगर पालिकेकडे हस्तांतरण करण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे यांच्यामार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बीड जिल्ह्यातील इंदिरा गांधीनगर येथे राहणाऱ्या व्यक्तीने केलेली आत्महत्या

**(४०) ६९४५३ (२७-०८-२०२३). श्री.संदिप क्षिरसागर (बीड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्ह्यातील इंदिरा गांधीनगर येथे राहणाऱ्या भारत विठ्ठल अवचार यांना तहसिलदार बीड यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चा कलम ५० अन्वये निष्कासन नोटीस संदर्भात दिनांक २६ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास घर निष्कासित करण्यासाठी नोटीस दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळा सुरु असतांना त्यांची घर खाली केल्यामळे त्यांचे कुटुंबिय रस्त्यावर आले असल्यामुळे भारत विठ्ठल अवचार यांनी विष प्राशन केल्यामुळे दिनांक १७ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास त्यांचा दुर्देवी मृत्यु झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कुटुंबियांतील कोणीही कमवणारी व्यक्ती नसल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची परिस्थिती उद्भवलेली आहे, अशा परिस्थितीत शासनाने मानवतेच्या दृष्टीकोनातून व विशेष बाब म्हणून त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करावी अशी मागणी संबंधित लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी, बीड, विभागीय आयुक्त, औरंगाबाद व तहसिलदार बीड यांच्याकडून दिनांक २० जून, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-११-२०२३) :** (१) होय, हे खरेआहे. गायरान जमिनीवरील अतिक्रमणांबाबत सिव्हील अपिल क्र. ११३/२०११ श्री. जगपाल सिंग व इतर विरुद्ध पंजाब राज्य व इतर याप्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने तसेच, सुमोटो जनहित याचिका क्र. २/२०२२ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.६.१०.२०२२ रोजी महाराष्ट्र राज्यातील गायरान जमिनीवरील अतिक्रमणे या वर्षाअखेर निष्कासित करण्यात यावेत असे आदेशित केले होते त्यानुसार निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे.
(२) होय, हे खरे आहे. सदर प्रकरणी पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन शिवाजीनगर यांचे मार्फत चौकशी करण्यात आली असून मयत श्री. भारत विठ्ठल आवचर यांनी त्यांना देण्यात आलेली गायरान जमिनीबाबतच्या नोटीसच्या चिंतेतून विषारी औषध पिवुन आत्महत्या केली आहे असे नमूद केले आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
(४) मयत श्री. भारत विठ्ठल अवचार यांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीमधुन आर्थिक मदत मिळण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी मुख्यमंत्री सचिवालयास प्रस्ताव पाठवला होता. मात्र मुख्यमंत्री सचिवालय कार्यालयाने दि.०४.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी बीड यांना सदर प्रकरणी तपासणी करून विविध

जिल्हास्तरीय योजनांतर्गत अर्थसहाय्य अनुज्ञेय असल्यास अर्थसहाय्य देण्याची व सदर प्रकरण जिल्हास्तरावर निकाली काढण्याची विनंती केली आहे. यानुषंगाने जिल्हाधिकारी बीड यांचे स्तरावरून पडताळणी करुन उचित कार्यवाही करण्याचे नियोजीत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावंतवाडी, दोडामार्ग व वेंगुर्ले (जि.सिंधुदूर्ग) येथे जंगल जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांना कायमस्वरुपी मालकी हक्क मिळण्याबाबत

**(४१) ६९५७९ (२७-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावंतवाडी, दोडामार्ग व वेंगुर्ले (जि.सिंधुदूर्ग) येथे जंगल जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांना कायमस्वरुपी मालकी हक्काने मिळावी अशी मागणी मागील अनेक वर्षापासून पारंपारिक वननिवासी शासनाकडे करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केवळ जंगल हद्दीतून जाण्याकरिता म्हणून वीज, पाणी व रस्ता यासारख्या मुलभूत सुविधाही वननिवासींना नाकारल्या असून अशा सर्व वस्त्यांना, गावांना, वाड्यांना मुलभूत सुविधांसाठी तातडीने परवानगी द्यावी अशीही मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच उक्त मागणीसाठी सावंतवाडी प्रांत कार्यालयावर दिनांक ४ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास मोर्चाही काढण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन वननिवासींच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-११-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) आदिवासी समाजाच्या मुलभूत सुविधांच्या मागण्यांसंदर्भात काढण्यात आलेल्या मोर्चाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी कार्यालय, सावंतवाडी यांचे दालनात दि.०४.०५.२०२३ रोजी निवेदनातील मुद्यांच्या अनुषंगाने बैठक आयोजित करून सदर बैठकीत संबंधितांना आवश्यक कार्यवाही करण्याबाबतचे सूचना दिलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणासाठी पॉवर टिलर व व्हिडर या यंत्राचा समावेश कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत लॉटरीच्या पहिल्या टप्प्यात करण्याबाबत

**(४२) ६९५८२ (२७-०८-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनामार्फत कृषी यांत्रिकीकरण योजना राबविली जात असून यामध्ये शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदानावर शेती अवजारे लॉटरी पध्दतीने दिले जातात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेच्या पहिल्या टप्प्यात ऊस पाचटकुटी यंत्र, भात पेरणी यंत्र या दोन यंत्राची लॉटरी काढण्यात येऊन दोन्ही यंत्राचा उपयोग कोकण पट्ट्यात केला जात नसल्याने कोकणासाठी पॉवर टिलर व व्हिडर या यंत्राचा समावेश उक्त योजनेंतर्गत लॉटरीच्या पहिल्या टप्प्यात करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सन २०२१ ते २०२४ या कालावधीत शेतकऱ्यांचे पॉवर टिलर व व्हिटर यंत्रासाठी ७८५२ अर्ज प्रतिक्षा यादीत असून माहे जून-जुलै, २०२३ पर्यंत लॉटरी काढून कोकणातील शेतकऱ्यांना आवश्यक

असलेले कृषी यंत्रे न मिळाल्यास आंदोलन करण्याचा इशाराही स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०६-११-२०२३) :** (१) होय, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, अल्प व अत्यल्प भू-धारक शेतकरी व महिला लाभार्थी यांना औजारांच्या किंमतीच्या ५०% व इतर शेतकरी यांना ४०% किंवा केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या अनुदान मर्यादा यापैकी जे कमी असेल त्या रक्कमेचे अनुदान देय आहे.
(२) होय, मा. श्री. विनायक राऊत, लोकसभा सदस्य यांनी लॉटरीची प्रक्रिया पूर्ण करुन आवश्यक अवजारे तात्काळ वितरीत करण्याबाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सिंधुदुर्ग यांना दिनांक ९.६.२०२३ रोजी पत्र दिले आहे.
(३) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सन २०२१ ते दिनांक ३१.८.२०२३ या कालावधीत शेतकऱ्यांचे अवजारांसाठी एकूण ६८३५ इतके अर्ज प्रलंबित आहेत.
(४) सन २०२२-२३ मध्ये लॉटरीद्वारे कृषि यांत्रिकीकरण घटकासाठी निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या अनुदान अदायगी मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याने माहे मे २०२३ अखेरीस काढण्यात आलेल्या लॉटरीपैकी फक्त आधुनिक पेरणी यंत्र (बीबीएफ) व कॉटन श्रेडर या अवजारासाठी निवड यादी प्रसिध्द करण्यात आली. सन २०२३-२४ साठी फक्त राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण कार्यक्रमासाठी यादी प्रसिध्द करण्याची कार्यवाही चालू आहे. दि.३१.८.२०२३ पर्यत सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी रु.१८०.१७ कोटी इतका निधी वितरीत केला असून १००% निधी खर्च झालेला आहे.
(५) केंद्र शासनाकडून निधी उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## राजापूर (जि.रत्नागिरी) येथील जैतापूर अणुउर्जा प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना मिळण्याबाबत

**(४३) ६९५९२ (०४-०९-२०२३). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजापूर (जि.रत्नागिरी) येथील जैतापूर अणुउर्जा प्रकल्पासाठी शेकडो एकर शेत जमिनी व बागायती जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जैतापूर अणुउर्जा प्रकल्पासाठी मिठ्गव्हाणे, कुवेशीइ .गावातील शेतकऱ्यांच्या भूसंपादन क्र.जैअऊप्र/एस/आर १२८४ /२०१५ व मौजे माडबन येथील एलएक्यू/एस/आर १२८४ व १२८८ या जमिनींचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात परस्पर जमा करण्याबाबत शासनाकडून आदेशित असताना अद्यापपर्यंत संबंधित शेतकऱ्यांना सदरहू रक्कम वितरीत करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भूसंपादित करण्यात आलेल्या संबंधित शेतकऱ्याच्या कुटुंबातील एका व्यक्तीस नोकरी देण्याबाबत किंवा त्याऐवजी ५ लाख रुपये मोबदला देण्याबाबतची मागणी संबंधित शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी व उपविभाग अधिकारी, राजापूर यांच्याकडे लेखी पत्रान्वये दिनांक २० जुलै, २०२२ वा त्यासुमारास केली असतानाही शासनाकडून उक्त प्रकरणी कोणतीही कार्यवाही न होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, संबधित जैतापूर प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना त्यांच्या संपादित जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-११-२०२३) :** (१) राजापूर (जि. रत्नागिरी) येथील जैतापूर अणुउर्जा प्रकल्पासाठी मौजे माडबन, मिठगवाणे, निवेली, करेल, वरीलपाडा या गावांमधील २३३६ खातेदार शेतकऱ्यांची सुमारे ९३८.०२ हे. आर. जमीन संपादन झालेली आहे.

(२) जैतापूर अणुउर्जा प्रकल्पासाठी मौजे माडबन, मिठगवाणे, निवेली, करेल, वरीलपाडा या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनींचा मोबदला परिपूर्ण कागदपत्र जमा केलेल्या संबंधित १८७१ खातेदार शेतकऱ्यांच्या बँक खात्यात सुमारे रु.१३६९.३७ लाख प्रत्यक्ष जमा करण्यात आले आहे. तसेच उर्वरीत खातेदार यांची भूसंपादन मोबदला रक्कम खातेदार यांचेकडून परिपूर्ण कागदपत्र प्राप्त झाल्यानंतर अदा करण्याची तजवीज ठेवलेली आहे.
(३) व (४) भूसंपादित करण्यात आलेल्या संबंधित शेतकऱ्यांच्या कुटुंबातील व्यक्ती प्रकल्पग्रस्त दाखल्यांची मागणी करीत आहेत. जैतापूर अणुउर्जा प्रकल्पासाठी मोबदला मिळण्यास पात्र असे एकुण २३३६ खातेदार आहेत. भूसंपादित करण्यात आलेल्या संबंधित खातेदारास रक्कम रु.५ लाख/नोकरी या कामी आतापर्यंत एकुण ११५१ प्रकल्प दाखले वितरीत करण्यात आलेले आहेत. त्यापैकी रु.५ लाख मागणी केलेल्या खातेदारांसाठी ८२७ व नोकरी मिळण्यासाठी २१ असे एकूण ८४८ दाखले जिल्हाधिकारी, रत्नागीरी यांचेकडून वितरीत करण्यात आलेले आहे. तसेच उपजिल्हाधिकारी (पूनर्वसन) रत्नागीरी यांचेकडून ३०३ खातेदारांना दाखले वितरीत करण्यात आलेले आहेत. उर्वरीत शिल्लक ११८५ खातेदार शेतकऱ्यांची मागणी व परिपूर्ण कागदपत्रे प्राप्त होताच प्रकल्पग्रस्त दाखले देण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात मागील दहा वर्षात एकही पशुवैद्यकीय दवाखाना मंजुर झाला नसल्याबाबत

**(४४) ७०१९२ (२४-०८-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात पशुधनाची संख्या वाढल्याने पशुधनाला सेवा देणाऱ्या सरकारी दवाखान्याची संख्या कमी असून मागील १० वर्षात एकही पशुवैद्यकीय दवाखाना मंजुर झाला नसल्याचे दिनांक १८ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले ,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सध्या ४८५१ पशुवैद्यकीय दवाखाने असून सुमारे ७८७ दवाखान्याची आवश्यकता असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, पशुधनाला "लंपी" जिवाणूजन्य व विषाणूजन्य आजार होत असून राज्यात सरकारी दवाखाने नसल्यामुळे खाजगी दवाखान्यादवारे शेतकऱ्यांची फसवणूक करत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी पशुवैद्यकीय दवाखान्यांचा अनुशेष भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२३-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) राज्यात सध्या ४८५२ पशुवैद्यकीय संस्था कार्यरत असून १५३ फिरते पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. पशुसंवर्धन विभागाचा आकृतीबंध सुधारित करण्याची कार्यवाही सुरु आहे. वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार आकृतीबंध सुधारणेनंतर दर्जावाढ करण्याची बाब संकल्पित आहे.

---

## अमरावती (जि.अमरावती) येथे आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत येथे आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या स्पर्धा पूर्व परिक्षा प्रशिक्षणामध्ये झालेली अनियमीतता

**(४५) ७०२९७ (१०-१०-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती आदिवासी विकास कार्यालया अमरावती मार्फत प्रकल्प कार्यालय पांढरकवडा व पुसद येथील आठ कॉलेज मधील जवळपास १६० विद्यार्थी यांना स्पर्धा परिक्षा पुर्व तयारी करिता ५० लक्ष एवढा निधी देण्यात आला असल्याचे दिनांक १३ जून, २०२३ रोजी निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विद्यार्थी स्पर्धा पुर्व परिक्षा तयारी प्रशिक्षणाकरीता जाहिरात न देता एका खाजगी संस्थेमार्फत जे.ई.ई./नि.ट./सि.ई.टी.ईत्यादी स्पर्धा परिक्षा करिता ५० लक्ष निधी वितरीत करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुर्व स्पर्धा परिक्षा करिता किमान तीन महिन्यांचा प्रशिक्षण कालावधी पाहिजे परंतू ४५ दिवस एका खेडेगावात आदिवासी विदयार्थांना प्रशिक्षण दिले आणि किती विदयार्थांना यांचा फायदा झाला यांची कुठलीही माहीती देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०६-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिरुर भूमि अभिलेख कार्यालयामध्ये शेतकऱ्यांच्या शेतजमीनींची मोजणी होऊन वर्षानंतरही 'क' प्रत मिळत नसल्याबाबत**

**(४६) ७०७९८ (२८-०८-२०२३). अॅड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरुर भूमिअभिलेख कार्यालयात शेतकऱ्यांच्या शेतजमिनीची मोजणी होऊन वर्षानंतरही 'क' प्रत (मोजणी नकाशा) उपलब्ध् होत नसल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून याबाबत शेतकऱ्यांनी संताप व्यक्त् केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कार्यालयातील मोजणी प्रकरणे न सापडणे, 'क' प्रत वर्षानंतरही न मिळणे, उशिरा भरणा करणाऱ्या मोजणी धारकांना लवकर मोजणी करुन देणे तसेच मोजणी प्रकरणांमध्ये अनेक गैरप्रकार श्री. ठाकरे तत्कालिन भूमि अभिलेख अधिकारी, शिरुर यांच्या कालावधीमध्ये झाल्याचे शेतकऱ्यांकडून तक्रारी होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच,शिरुर भूमि अभिलेख कार्यालयातील उपअधिक्षक भूमि अभिलेख हे पद दिनांक ९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास रिक्त् असून यापदासह इतर १० पदे रिक्त् आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त रिक्त् पदांमुळे शेतकऱ्यांची नागरिकांची कामे वेळेवर मार्गी लागत नसून भूमिअभिलेख कार्यालय शिरुर येथे माहे जून, २०२३ पर्यत १४०० मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास,याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-११-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
उपअधिक्षक, भूमि अभिलेख, शिरुर कार्यालयात जून २०२३ मध्ये ६८५ मोजणी प्रकरणे क प्रत देणेवर प्रलंबित होती. त्या सर्व प्रकरणांमध्ये संबंधीत अर्जदार यांना दुरध्वनी संदेशाद्वारे कळवून पोस्टाने क प्रत देण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. संबंधीत तत्कालीन उप अधीक्षक भूमि अभिलेख, शिरूर यांचेवर जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे यांचे कार्यालयाकडून विभागीय चौकशी प्रस्तावित करणेत आलेली आहे.
(३) व (४) होय,हे खरे आहे.
माहे जून २०२३ अखेर उप अधीक्षक भूमि अभिलेख, शिरूर कार्यालयात एकूण ७ पदे अखेर रिक्त होती. माहे जुलै २०२३ मध्ये ६ कर्मचारी हजर झाल्याने सध्या मंजूर २८ पदापैकी एकूण २ पदे रिक्त आहेत. माहे जुन- २०२३ अखेर सदर कार्यालयात एकूण-१६०८ मोजणी प्रकरणे प्रलंबित होती.

(५) शिरुर तालुक्यातील प्रलंबित मोजणी प्रकरणे निकाली करणेकामी इतर कार्यालयातील ५० कर्मचारी यांची नियुक्ती करणेत आली असून खाजगी यंत्रणेचीही मदत घेणेत आलेली आहे.
(६) प्रश्न उद्धवत नाही.

---

**मौजा सिरसोली (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील एका शेतकरी महिलेच्या शेतातील ७५ सागवानाची झाडे विनापरवानगी तोडल्याबाबत**

**(४७) ७०८५८ (११-०९-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा सिरसोली (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील शेतकरी श्रीमती पुष्पलताताई वाघ यांचे शेतातील ७५ सागवनाची झाडे विना परवानगी तोडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत महिला शेतकरी यांनी वन विभाग, आष्टी यांना वारंवार तक्रारी देवूनही कोणतीही चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी झाडे तोडणाऱ्या आरोपीवर व दिरंगाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने काणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-११-२०२३) :** (१) सदर प्रकरणी चौकशी केली असता मौजा शिरसोली येथील शेतकरी श्रीमती पुष्पलताताई वाघ यांच्या शेतातील सागवानाची झाडे तोडल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(२) दि.२४ मार्च,२०२३ रोजी श्रीमती पुष्पलता वाघ, मौजा सिरसोली (ता. आष्टी, जि. वर्धा) यांच्या शेतातील साग झाडे विनापरवाना तोड केल्याबाबतची तक्रार वनपरिक्षेत्र अधिकारी आष्टी यांच्याकडे प्राप्त झाली होती. त्याअनुषंगाने चौकशी करण्यात आली.
(३) वृक्षतोडी संबंधी वनपरिक्षेत्र आष्टी यांनी चौकशी केली असता श्रीमती पुष्पलता वाघ, मौजा सिरसोली (ता. आष्टी, जि. वर्धा) यांच्या शेतातील वृक्षतोड झालेली नसुन लगतचे कास्तकार श्री. रेवाशंकर अजाबराव वाघ यांच्या मालकीचे सर्व्हे नं.३ मौजा मोमीनपुर येथील वृक्ष कटाई वन विभागाची पुर्व परवानगी घेवून वाहतुक करण्यात आलेली आहे.
तक्रार कर्ते यांच्या शेतातील अवैध वृक्षतोड झाली नसल्याने आरोपीवर/ दिरंगाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा प्रश्नच उद्धवत नाही.
(४) प्रश्न उद्धवत नाही.

---

**चिकनघर (ता.कल्याण (प.), जि.ठाणे) येथील सहाय्यक दुय्यम निबंधक कार्यालय-२ इमारतीचे नुकसान झाल्याबाबत**

**(४८) ७०९१६ (२७-०८-२०२३). श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिकनघर (ता.कल्याण (प.), जि.ठाणे) येथील सहाय्यक दुय्यम निबंधक कार्यालय-२ हे चाळीस वर्ष जुन्या इमारतीत भाडे तत्त्वावर सुरु असून सदर इमारतीचे अतिशय नुकसान झाल्याचे दिनांक १ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यालात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी तसेच कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांना जीव मुठीत घेऊन काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने सदर कार्यालयाकरिता नवीन इमारत मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०७-११-२०२३) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथे घरगुती सुतारकाम करणाऱ्या कारागिरांच्या छोट्या आरायंत्र धारकांना परवाना मिळण्याबाबत**

**(४९) ७१०२९ (११-०९-२०२३). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथे घरगुती सुतारकाम करणाऱ्या कारागिरांच्या १४ ते २४ इंचापर्यंतच्या छोट्या आरायंत्राबाबतची सुनावणी दिनांक २९ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.राज्यस्तरीय कमिटी यांच्यासमवेत झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात कारागिरांनी केलेल्या आरायंत्राना अद्यापपर्यंत छोट्या आरायंत्र धारकांना परवाने मिळाले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन छोट्या धारकांना परवाना मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०१-११-२०२३) :** (१) दिनांक २९ ऑगस्ट २०२२ रोजी राज्य स्तरीय समितीच्या २१ व्या सभेत कोल्हापूर जिल्ह्यातील लोहार-सुतार संघ यांच्या घरगुती सुतारकाम करणाऱ्या कारागिरांच्या १४ ते २४ इंचापर्यंतच्या छोटया आरायंत्राबाबतचा विषय चर्चेसाठी ठेवण्यात आला होता.
(२) व (३) घरगुती सुतारकाम करणाऱ्या कारागिरांच्या १४ ते २४ इंचापर्यंतच्या छोटया आरायंत्राबाबतचा विषय पुन:श्च दि.३ मे, २०२३ च्या राज्य स्तरीय समितीच्या २२ व्या सभेत ठेवण्यात आला होता. सदर सभेत लोहार-सुतार करागिर संघाच्या मागणीवर महाराष्ट्र वन नियमावली, २०१४ मधील तरतूदींच्या अधीन राहून घरगुती सुतारकाम करणाऱ्या कारागिरांना परवानगी देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर येथील मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ता योजनेतून रस्त्यांच्या कामांना मंजूरी मिळण्याबाबत**

**(५०) ७१४२५ (२९-०८-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर येथील मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पाणंद रस्ता योजनेतून सुमारे ११०० किलोमीटरच्या एकूण ९१४ रस्त्यांच्या कामांना मंजुरी मिळाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामांपैकी केवळ २८८ रस्त्यांच्या कामांना कार्यारंभ आदेश प्राप्त झाले असून प्रत्यक्षात केवळ ३ रस्त्यांची कामे सुरु झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी उर्वरित कामांना कार्यारंभ आदेश प्राप्त होऊन प्रत्यक्ष कामांना सुरुवात करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संदीपानराव भुमरे (०६-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) माहे मे, २०२३ अखेर अहमदनगर जिल्ह्याकरीता शासनस्तरावरुन मंजूर एकुण ९१४ कामांपैकी २८८ कामांना प्रशासकीय मान्यतेसह कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. मजूरांमार्फत कामाची मागणीनुसार कर्जत-३,पारनेर-३ आणि नेवासा-१ अशी कामे सध्या सुरु आहेत, कार्यारंभ आदेश मान्यताप्राप्त उर्वरित कामे सुरु करण्यासाठी वेळोवेळी आढावा घेण्यात येत असुन तालुकास्तरीय अधिकाऱ्याना सूचना करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.